MHBH070000372014

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२०१/२०२३</u>
( बबन वि. सुमित )

<u>निशाणी २३ वरील आदेश</u>
(दिनांक २२/०१/२०२५ रोजी पारित)

प्रस्तुतचा अर्ज आक्षेपक यांनी लेखी जबाबमध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे की, लेखी जबाबमध्ये मुळ अर्जदाराचा पत्ता चुकीने सावरगांव गोरे लिहीला आहे तो तसा नसून मौजे लोहारा, ता. जि. हिंगोली येथील रहीवाशी आहे. त्याचप्रमाणे अर्जदाराबाबत प्रस्तावित दुरूस्तीमध्ये नमूद केलेली माहीती आक्षेपक यांना नुकतीच समजलेली आहे. त्या अनुषंगाने आक्षेपक कैफियतमध्ये दुरूस्ती करू ईच्छीत आहेत. कैफियतमध्ये प्रस्तावीत दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रस्तावित दुरूस्तीमुळे अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु कैफियतमधील दुरुस्तीस परवानगी न मिळाल्यास आक्षेपकाचे कधीही न भरून न येणारे नुकसान होईल. म्हणुन अर्जदाराने अर्जात नमुद केल्याप्रमाणे कैफियतमध्ये प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याचा अनुतोष मागीतला आहे.

३. मुळ अर्जदाराने त्याचे म्हणणे (निशाणी २७) देवुन अर्ज मंजूर करण्यास आक्षेप घेतला आहे. मुळ अर्जदाराचे म्हणणे असे की, प्रस्तुतचा दुरूस्ती अर्ज मुळ अर्जाचे कामकाजास विलंब करण्याच्या उद्देशाने दाखल केलेला आहे. त्यानंतर त्यांनी प्रस्तावित दुरुस्ती मधील मजकुर खोटा असल्याचे म्हटले आहे व त्याबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे. शेवटी प्रस्तावित दुरुस्ती मुळे म्हणण्याचे स्वरूप बदलत आहे. त्यामुळे प्रस्तावित दुरूस्ती करण्यास परवानगी देवू नये. शेवटी त्यांनी अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली.

४. अर्जदाराच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रस्तावीत दुरुस्ती दाव्याच्या योग्य निर्णयासाठी आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावा.

५. मुळ अर्जदाराच्या वकीलांनी प्रस्तावित दुरूस्ती अर्जातील वादमुद्दया निर्णय घेण्यासाठी आवश्यक नसल्याचा युक्तीवाद करून अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

६. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता, आक्षेपकाने अर्जास म्हणणे देतेवेळी गावाच्या नावात लेखनाच्या चुकीमुळे चुक झाल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे त्यासंदर्भात स्पष्टीकरण प्रस्तावित दुरूस्तीमध्यू नमूद करून ते अर्जाच्या अभिलेखास आणू इच्छीत आहे. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे कैफियतच्या मुळ स्वरुपात बदल होत नाही किंवा त्यामुळे अर्जदारास कोणत्याही आश्चर्यकारक वस्तुस्थीतीचा सामना करावा लागणार नाही.

७. स्टेट ऑफ आंध्रप्रदेश आणि इतर वि. मे. पायोनियर बिल्डर्स आंध्रप्रदेश, ए.आय.आर. २००७ एस.सी. ११३ या न्यायनिर्णयात मा. सर्वोच्च न्यायालय यांनी वाद कथनामध्ये उदारपणे दुरुस्ती करण्याचा मुख्य उद्देश हा निरनिराळे दावे टाळणे असल्याचे मत नोंदवलेले आहे. अशा परिस्थितीत, निरनिराळे दावे टाळणेसाठी सदर अर्जात प्रस्तावित केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

८. प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकन केले असता कैफियतमध्ये प्रस्तावित दुरुस्ती समाविष्ट केल्यास बचावाचे स्वरुप बदलणार नाही. अर्जदाराने प्रस्तावित दुरुस्ती अन्वये कोणतीही कबुली काढून घेतलेली नाही. दाव्यातील व कैफियत मधील दुरूस्तीचे मानके तंतोतंत सारखी नसतात (बलदेव व ईतर वि. मनोहरसिंग व ईतर, २००६(५), एस.सि.सि.६३४). कायदयाचे प्रस्तापित तत्व असे आहे की कथनातील दुरूस्तीच्यावेळी प्रस्तावित दुरूस्तीमधील मजकुराचा गुणवत्तेवर विचार करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे मुळ अर्जदाराच्या अर्ज मंजूर करण्याससाठीच्या आक्षेपात तथ्य दिसून येत नाही.

९. त्यामुळे, कैफियतमध्ये दुरुस्ती केल्यास मुळ अर्जदारास अडचणीचे ठरणार नाही. प्रस्तावित कैफियत दुरुस्तीमुळे मुळ अर्जदारास काही एक हानी पोहोचणार नाही. प्रस्तुतच्या दुरुस्तीने कैफियतच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच, मुळ अर्जदारास कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये आक्षेपक कुठल्याही प्रकारे नवीन बचाव मांडत नाही. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच अर्जदार व आक्षेपक यांच्यातील खऱ्या वादाच्या मुद्दयावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. वरील सर्व कारणांचा विचार करुन पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.
२. अर्जदारास अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे कैफियतमध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.
३. अर्जदाराने कैफियतमध्ये आवश्यक ती दुरुस्ती व त्या अनुषंगाने आवश्यक असणारी कार्यवाही १४ दिवसात किंवा तत्पूर्वी करुन घ्यावी.

Digitally signed by NANDKUMAR BALASAHEB JADHAV
Date: 2025.01.23 11:25:50 +0530

पुसद
दिनांकः २२/०१/२०२५

(एन.बी. जाधव)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पुसद

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. N. B. Jadhav, Civil Judge Senior Division, Pusad |
| Name of the Steno | : | Yuvaraj D. Belkhedkar, Steno Grade-II |
| Judgment date | : | 22/01/2025 |
| Judgment signed by P.O. on | : | 22/01/2025 |
| Judgment uploaded on | : | 22/01/2025 |